SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९३२९४, २६९१५३३ व २६९२३३३.

B Accredited By NAAC

जा.क्र. संलग्नता/टे.१/युजीके/ ०८ दिनांक : 20 APR 2012

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यता प्राप्त शिक्षण संस्था

**विषय** दि. १९९१ ते २००० कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करून त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत.

संदर्भ : क्र. युएनआय/नेट-सेट/विशि(६)/२०११ दि. २८/०३/२०१२ चे मा. शिक्षण संचालक, (उ.शि.) पुणे यांचे पत्र

क्र. युएनआय/नेट-सेट/विशि(६)/२०१२ दि. ३०/०३/२०१२ चे मा. शिक्षण संचालक, (उ.शि.) पुणे यांचे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, दि. १९/०९/१९९१ ते ०३/०४/२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट मधून दिलेली आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करावयाची झाल्यास शासनावर किती आर्थिक भार पडणार आहे याची माहिती संकलित करून सीडी व हार्ड कॉपी या दोन्ही स्वरूपात तातडीने पुणे संचालनालयास खास दुतामार्फत सादर करावयाची आहे.

सोबत मा. शिक्षण संचालक यांचे दि. ३०/०३/२०१२ चे पत्र जोडले आहे. त्यामधील ***विवरणपत्र 'ब'* मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये आपल्या महाविद्यालयातील संबंधित शिक्षकांची माहिती भरून ती तातडीने (दि. २७/०४/२०१२ पर्यत) खास दुतामार्फत विद्यापीठ कार्यालयात सादर करावी.**

सदरचे काम अतितात्काळ करावयाचे असल्याने आपण विशेष लक्ष घालून ते कार्यमर्यादेत पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. याप्रकरणी शासन वारंवार पाठपुरावा करीत असल्याने सदर माहिती अभावी होणाऱ्या परिणामांची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची/ शिक्षण संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

कळावे,

सोबत : वरील प्रमाणे

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
संलग्नता विभाग

टिप :

१) उपरोक्त विषयासंदर्भात यापूर्वी माहे मार्च २०११ व माहे सप्टेंबर २०११ मध्ये महाविद्यालयांकडून माहिती मागविली होती. सदरची माहिती संकलित करून ती शासनास सादर केली आहे. यापूर्वीची माहिती व सोबतच्या विवरणपत्रातील माहिती यामध्ये बदल असल्याने ती संपूर्ण माहिती बिनचूक द्यावी.
२) सदरची माहिती फक्त शासनमान्य व अनुदानित अशासकीय महाविद्यालयांनी/संस्थांनी द्यावयाची आहे.
३) सदरचे पत्र, शासनपत्र व विवरण पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in B.C.U.D. - Circular याठिकाणी ठेवण्यात आले आहे.

[P.T.O.]

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dirhe.org.in
E-Mail : dhepune@yahoo.co.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र. युएनआय/नेट-सेट/विशि(६)/२०१२/ दिनांक: ३० मार्च, २०१२

<u>अत्यंत महत्वाचे/तातडीचे</u>

SHIVAJI UNIVERSITY
Director, R.UD s Office
Date : 2 APR 2012
Inward No. : 29270
To Whom :

प्रति,
१. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.
२. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय: दि. १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत..**

संदर्भ: १. शासनपत्र क्र.:बैठक २०१२/(७६/१२)/विशि-१ दि. २६ मार्च, २०१२
२. विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.: एफ १-३/२०११ (पीएस)एक्झांप दि. १५.३.२०१२
३. या संचालनालयाचे पत्र क्र.: युएनआय/नेट-सेट/विशि(६)/२०११/१०३८१ दि. २८ मार्च, २०१२

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ पत्र क्र. ३ कृपया अवलोकनी घ्यावे. सदर पत्रामध्ये (परिच्छेद एक) पुढीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १५.३.२०१२ च्या पत्रान्वये दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल, २००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा, त्यांना <u>संबंधित विद्यापीठाने सूट दिलेल्या दिनांकापासून</u> ग्राह्य धरण्यात याव्यात असे शासनास कळविले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे संदर्भांकित आदेश विचारात घेता आपल्या विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील, बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना विद्यापीठाकडून, ज्या दिनांकास नेट/सेट मधून सूट देण्यात आलेली आहे. त्या दिनांकापासून कॅस चे लाभ द्यावयाचे झाल्यास किती अतिरीक्त आर्थिक भार येईल याबाबतची माहिती पुढील विवरणपत्रामध्ये सादर करावी.

---

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने विवरणपत्र अ मधील रकाना क्र. ६ व विवरणपत्र ब मधील रकाना क्र. ७ मध्ये अंशतः बदल करण्यात आलेला आहे. सुधारीत विवरणपत्रे सोबत जोडण्यात येत आहेत.

संदर्भ पत्र क्र. ३ परिच्छेद २ ते ७ मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदर माहिती अचूक स्वरुपात व विहीत कालमर्यादेमध्ये सादर करावी.

(डॉ.प्र.श.गायकवाड)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.

प्रत: मा.विकास तु. कदम- कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२. यांना संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

[P. T. O.]

## विवरणपत्र ब

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | अध्यापकाचे नाव | नियमित सेवेत नियुक्तीचा दिनांक | यु.जी.सी.कडे प्रस्ताव सादर केलेल्या पत्राचा क्र. व दिनांक | यु.जी.सी.ने नेट/सेट मधून सूट दिलेल्या पत्राचा क्र. व दिनांक | विद्यापीठाने नेट/सेट मधून सूट दिल्याचा दिनांक | सूट दिलेल्या तारखेपून कॅस लागू केल्यास वरिष्ठ वेतनश्रेणी देय होणारा दिनांक | सूट दिलेल्या तारखेपासून निवडश्रेणी देय होणारा दिनांक | रकाना क्र. ८ व ९ मधील तारखांना वेतननिश्चिती करावयाची असल्यास येणा-या आर्थिक फरकाचा एकुण भार (वर्षनिहाय परिगणना करुन) | शेरा/अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | एकुण = | | |

सहसंचालक (उच्च शिक्षण)
------ विभाग ------

3 FAX 02026051729 DIR H EDU BED CELL K ☑003